ePaper

## नव्या संसदेचं उद्घाटन, नरेंद्र मोदी करणार राष्ट्राला समर्पित



| वर्ष - 7 ।अंक -31 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ।रविवार, दि. 28 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**


- पुणेकरांसाठी मोठा दिलासा!
- पुण्यात पंधरा दिवस पुरेल एवढाच रक्तसाठा


# पिंपरी चिंचवडमधील कायदा आणि सुव्यवस्था ऐरणीवर

# खाकीच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह!

## मस्करीची कुस्करी: खिशातला मोबाईल काढला म्हणून मित्राला जिवानिशी मारलं

**। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी चिंचवडमधील कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती काही केल्या सुधारायला तयार नाहीये. त्यामुळे खाकी वर्दीच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झालंय. त्यामुळे अशा घटना थांबवण्यासाठी पोलिसांनी तत्काळ आवश्यक त्या उपाय योजना कराव्यात अशी मागणी आता नागरिकांमधून होऊ लागली आहे. शहरात गेल्या काही दिवसांपासून खुनाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. चिखली येथील खुनाची घटना ताजी असतानाच भोसरी परिसरात मस्करीमध्ये मित्राच्या खिशातला मोबाईल काढल्याच्या कारणावरून एका तरुणाची डोक्यात दगड घालून हत्या केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेने भोसरी परिसरात एकच खळबळ उडाली आहे.**




नारायण वसंत वाघमारे असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. भोसरी परिसरातील इंद्रायणी नगर येथे ही घटना घडली आहे. पोलिसांनी घटनेची दखल घेत अमर उर्फ एक्या गौतम कसबे (वय २४) याला ताब्यात घेतले आहे. मृताचा भाऊ भगवान वसंत वाघमारे यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### नेमकी घटना काय?

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, नारायण वाघमारे आणि अमर कसबे हे शुक्रवारी दुपारच्या सुमारास इंद्रायणी नगर येथे असणाऱ्या चौकात गप्पा मारत बसले होते. त्यावेळी नारायण याने मस्करीमध्ये अमरच्या खिशातील मोबाईल काढला. मात्र अमर याला आपल्या खिशातून मोबाईल काढल्याचे आवडले नाही. याच गोष्टीचा राग मनात धरून अमर याने नारायणाला मारण्यास सुरुवात केली. त्याला मारहाण करत खाली जमिनीवर पाडले. त्यानंतर रागाच्या भरात नारायण याच्या डोक्यात बाजूला असलेला दगड घातला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या नारायणला रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र आज सकाळी त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले.पिंपरी-चिंचवड शहर आणि परिसरात खुनाच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. शिरगाव, तळेगाव चिखली आणि आता भोसरी या भागात खुनाच्या घटना घडल्या आहेत. पोलिसांच्या कार्यक्षमतेवर यामुळे प्रश्न चिन्ह निर्माण होऊ लागले आहे.

# भूमकर चौकातील एकेरी वाहतूकमुळे स्थानिकांना मनस्ताप!

## तत्काळ उपाययोजना करा: खासदार श्रीरंग बारणे यांची पोलीस आयुक्तांना सूचना

**। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**राज्यातीलआयटी पार्क हिंजवडीकडे जाण्या-या भूमकर चौक, विनोदेवस्ती व लक्ष्मी चौकातील मार्गावर एकेरी वाहतूक केल्याने कोंडी सुटण्याऐवजी त्यात भर पडली आहे. एकेरी वाहतूक पद्धतीमुळे नागरिक, व्यापारी यांना दोन किलोमीटरचा वळसा मारावा लागत आहे. यातून मार्ग काढण्यासाठी तत्काळ प्रभावी उपाययोजना करण्याच्या सूचना शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी पोलीस प्रशासनाला केल्या आहेत.**



याबाबत पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांना निवेदन दिले आहे. त्यात खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, आयटी पार्क हिंजवडीकडे जाण्या-या भूमकर चौक विनोदेवस्ती आणि लक्ष्मी चौकातील मार्गावर एकेरी वाहतूक करण्यात आली आहे. या एकेरी वाहतूक पद्धतीमुळे त्या भागातील नागरिक, व्यापारी यांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागत आहे. त्या भागातील रहिवाशांची मोठी गैरसोय होत आहे. किरकोळ कामासाठी सुद्धा दोन किलोमीटरचा वळसा घालून जावे लागते. हे त्रासदायक ठरत आहे. त्याच भागातून जाताना वाहतूक कोंडी होत असून पादचा-यांना जीव मुठीत धरून रस्ता ओलांडावा लागत आहे.

या संदर्भात याभागातील नागरिक व व्यापारी यांनी त्यांना होणा-या त्रासाची कैफियत माझ्याकडे मांडली आहे. यातून लवकरात लवकर मार्ग काढावा. अन्यथा रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा स्थानिकांनी दिला आहे. त्यामुळे आपण गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेवून त्वरित उपाययोजना कराव्यात, असे बारणे यांनी निवेदनात म्हटले आहे.

# पुणेकरांसाठी मोठा दिलासा!

## अखेर त्या उन्नत मार्गाचे काम सुरू होणार, वाहतूक कोंडी होणार दूर

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे-नगर मार्गावरील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून आता नाशिक फाटा ते खेडपर्यंतच्या सुमारे ३० किलोमीटरच्या 'उन्नत मार्ग' (एलिव्हेटेड) महामार्गाच्या भूसंपादनाच्या कामास सुरुवात झाली आहे. मात्र, प्रत्यक्षात या कामासाठी येत्या ऑक्टोबरपासून सुरुवात होणार आहे. त्यामुळे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (एनएचएआय) पुण्यातील महामार्गांच्या कामांना गती मिळणार आहे. या प्रकल्पांसाठी राज्य सरकारचा नेमका किती वाटा असणार याबाबत सध्या चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.**



पुणे-नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून एलिव्हेटेड महामार्गाचा प्रस्ताव 'एनएचएआय'ने तयार केला आहे. त्यामध्ये नाशिक फाटा ते खेड, तळेगाव-चाकण-शिक्रापूर; तसेच पुणे-शिरुर मार्गावरील वाघोली-शिक्रापूर-रांजणगाव, हडपसर-यवत या मार्गावर 'एलिव्हेटेड महामार्ग' तयार करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या कामांचा सर्वंकष प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला आहे. या संदर्भात दोन आठवड्यांपूर्वी केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे; तसेच अन्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मुंबईत बैठक झाली. त्या वेळी 'एनएचएआय'ने पुण्यातील विविध मार्गांचे सादरीकरण करीत ३५ हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव सरकारकडे दिल्याचे जाहीर केले. या प्रकल्पांसाठी राज्य सरकारचा नेमका किती वाटा असणार याबाबत सध्या चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

### ऑक्टोबरपासून कामाला सुरुवात

» 'एनएचएआय'चे प्रकल्प संचालक संजय कदम म्हणाले, 'पुण्यातील विविध ठिकाणच्या 'एलिव्हेटेड महामार्गां'च्या 'डीपीआर'ला केंद्राने मान्यता दिली आहे. नाशिक फाटा ते खेड या ३० किलोमीटरच्या मार्गांचे भूसंपादन सुरू झाले आहे. या आठ पदरी 'एलिव्हेटेड महामार्गा'साठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने ६१ मीटर आणि मोशीच्या पुढे पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) राजगुरुनगरपर्यंतची ४५ मीटर जागा देण्याचे मान्य केले आहे.

» त्यामुळे भूसंपादनाचे काम झाल्यावर येत्या ऑक्टोबरपासून प्रत्यक्षात या मार्गाचे काम सुरू होईल. वाघोली ते शिक्रापूर या एलिव्हेटेड महामार्गाचा डीपीआर तयार करण्याचे काम अद्याप सुरू आहे.'

## महावितरणकडून विघ्नहर कारखान्यावर ५६ लाख रुपयांची दंडात्मक कारवाई

। नारायणगाव ।
महाईन्यूज ।

विघ्नहर कारखान्यास ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या वीज बिलांची थकीत वीज देयके ऊस बिलाच्या रकमेतून वसूल न केल्याने महावितरण कंपनीकडून कारखान्यावर ५६ लाख ७२ हजार १५२ रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे कारखान्यास मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागत असल्याचे विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांनी सांगितले.

शेरकर म्हणाले, की विघ्नहरच्या ६ मेगावॅट क्षमता असलेल्या सहवीज निर्मिती प्रकल्पाचे वीज करारानुसार ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या ऊस बिलांमधून संबंधित शेतकरी वर्गाच्या थकीत वीज देयकांची रक्कम कारखान्याने वसूल करून द्यावी असे नमूद होते. मात्र, ऊस पुरवठा करणाऱ्या सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी त्यांचे ऊस बिलातून थकीत वीज देयके कपात करण्यास प्रखर विरोध दर्शविला. कारखान्याने संबंधितांची थकीत वीज देयके ऊस बिलांमधून वसूल केली नसल्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी वर्गास दिलासा मिळाला. मात्र, वीज वितरण कंपनीने विघ्नहर कारखान्यास ऊस पुरवठा करणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून थकीत वीज देयके वसूल न केल्यामुळे कारखान्यास २०२०-२१ या वर्षासाठी २६ लाख २१ हजार ६० रुपये, तर २०२१-२२ या वर्षासाठी ३० लाख ५१ हजार ९२ रुपये असा ५६ लाख ७२ हजार १५२ रुपये दंड आकारला आहे.

# पुण्यात पंधरा दिवस पुरेल एवढाच रक्तसाठा

## उन्हाळ्यामुळे रक्तदान शिबिरांमध्ये घट

।पुणे । महाईन्यूज

**उन्हाळ्यामुळे रक्तदान शिबिरांची संख्या कमी झाल्याने पुणे शहरातील रक्तपेढ्यांमध्ये पंधरा दिवस पुरेल एवढाच रक्तसाठा शिल्लक आहे. परिणामी शहरात जूनमध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता रक्तपेढ्यांच्या व्यवस्थापनाने व्यक्त केली आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये महाविद्यालये बंद असतात; तसेच उन्हाच्या तीव्रतेमुळे सामाजिक संघटनादेखील शिबिरांचे आयोजन करीत नाहीत. यामुळे उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये कायमच रक्ताचा तुटवडा निर्माण होत असतो.**



उन्हाळ्यात रक्ताचा तुटवडा आणि त्यानंतर लगेच पावसाळ्यात डेंगीच्या रुग्णांची संख्या वाढत असते. डेंगीच्या रुग्णांना 'प्लेटलेट' द्यावे लागतात. त्यामुळे दर वर्षी पावसाळ्यात रक्त आणि 'प्लेटलेट'ची मागणी वाढत असते. त्यामुळे दर वर्षी उन्हाळा आणि पावसाळ्यात रक्ताचा तुटवडा जाणवतो. दर वर्षी तुटवडा निर्माण होऊ नये, म्हणून रक्तसाठ्याचे नियोजन करणे आवश्यक असल्याचे रक्तदान चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी सांगितले.

शिबिरांची संख्या कमी झाली आहे. रक्तपेढ्यांकडे जून मध्ये शिबिरांचे नियोजन नसल्याचे दिसून येत आहे; तसेच पावसाळ्यात साथीच्या आजारांच्या रुग्णांची संख्या वाढत असते. त्यामुळे जूनमध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे. शिबिर घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

### रक्तदान करण्याचे आवाहन

» पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील रक्तपेढीचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. शंकर मोसळगी म्हणाले, 'दर वर्षी उन्हाळ्यात रक्ताचा तुटवडा निर्माण होतो, त्यामुळे यंदा एप्रिलमध्ये जास्त शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, सध्या पुढील दहा ते पंधरा दिवस पुरले एवढाच रक्ताचा साठा शिल्लक आहे. त्यामुळे शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.' ससून रुग्णालय रक्तपेढीचे प्रमुख डॉ. सोमनाथ खेडकर यांनी सांगितले, 'एप्रिलपासून शिबिरांची संख्या कमी झाली आहे. सध्या ५०० रक्त पिशव्या शिल्लक आहे. सध्याच्या मागणीनुसार हा रक्तसाठा पंधरा दिवस पुरले असा अंदाज आहे. त्यामुळे रक्तदात्यांनी रक्तदान करावे.'

### उन्हाळ्यात का जाणवतो तुटवडा?

» सुट्ट्यांमध्ये शस्त्रक्रियांचे नियोजन केले जाते.
» सुट्ट्यांमुळे शिबिरांचे संख्या कमी होते.
» गंभीर आजारांचे रुग्ण उपचार घेण्यासाठी बाहेरगावाहून रुग्ण शहरात येतात.
» उन्हाळामुळे रक्तदान करणाऱ्यांची संख्या घटते.

# जिल्हा विभाजनाच्या मागणीला 'बळ'!

## संघटनात्मक बदलांमध्ये दोन विभाग : जिल्ह्याला दोन अध्यक्षपदाची निर्मिती?

**। पुणे । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी।**

**पुणे जिल्ह्याचे विभाजन करून नवीन जिल्हा तयार करावा आणि त्याला 'शिवनेरी' हे नाव द्यावे, अशी मागणी पिंपरी-चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी काही दिवसांपूर्वी केली. त्या मागणीला भारतीय जनता पार्टीकडून 'बळ' देण्यात येत आहे. कारण, भाजपाच्या संघटनात्मक बांधणीमध्ये उत्तर पुणे जिल्हा आणि दक्षिण पुणे जिल्हा असे दोन विभाग करण्याबाबत शिक्कामोर्तब झाले आहे, अशी माहिती विश्वासनीय सूत्रांनी दिली.**





भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार पुणे शहर प्रभारी म्हणून अमर साबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर पिंपरी-चिंचवड शहराच्या प्रभारी म्हणून वर्षा डहाळे यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली आहे.

आगामी महापालिका, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीने जोरदार तयारी सुरू केली आहे.

विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी नियुक्ती देण्यात आलेले राजेश पांडे यांना आता पुणे ग्रामीण आणि मावळचे प्रभारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे भाजपने पुणे जिल्ह्यासाठी भाकरी फिरवण्यास सुरुवात केली आहे. तसेच, भाजपाकडून आता नवीन २ विभाग करण्यात येणार आहेत. त्यात उत्तर पुणे जिल्हा आणि दक्षिण पुणे जिल्हा असे विभाग करण्यात येणार आहेत. त्यासाठी २ जिल्हाध्यक्ष देखील निवडले जाणार आहेत.

पिंपरी-चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष महेश लांडगे यांनी पुणे जिल्ह्याचे विभाजन करुन 'शिवनेरी' हा नवीन जिल्हा तयार करावा, अशी मागणी केली होती. त्याला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा विभाजनाच्या मागणीचा एकत्रित विचार करावा लागेल, असे सांगितले होते. त्यानंतर अल्पावधीतच भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून ज्यापद्धतीने संघटनात्मक बदल करताना उत्तर पुणे जिल्हा आणि दक्षिण पुणे जिल्हा असे दोन विभाग करण्याबाबत हालचाली सुरू आहेत. त्यासाठी वेगवेगळे जिल्हाध्यक्ष करण्यात येणार आहेत. त्यामुळे आमदार लांडगे यांच्या जिल्हा विभाजनाच्या मागणीला बळ मिळाले आहे.

### राष्ट्रवादीची कोंडी करण्याची तयारी...

**पुणे जिल्ह्यातील २१ पैकी ११ विधानसभा मतदार संघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पाटीचे आमदार निवडून आले आहेत. कसबा मतदार संघात दोन महिन्यांपूर्वी पोटनिवडणूक झाली. त्या ठिकाणी महाविकास आघाडीच्या माध्यमातून काँग्रेसला यश मिळाले. त्यामुळे जिल्ह्यात भाजपाच्या आणि शिंदे गटाच्या तुलनेत महाविकास आघाडी आणि पर्यायाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची ताकद मोठी आहे. तसेच, राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांचा पुणे जिल्हा म्हणजे 'होम पिच' म्हणून ओळखला जातो. भाजपाला आगामी निवडणुकांमध्ये यश मिळवण्यासाठी राष्ट्रवादीला पुणे जिल्ह्यात रोखण्याचे आव्हान पेलावे लागणार आहे. त्याअनुशंगाने भारतीय जनता पार्टीकडून पुणे जिल्ह्याचे विभाजन करण्याच्या मागणीला साथ दिली जाईल आणि राष्ट्रवादीची कोंडी केली जाईल, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.**

# भोसरीत छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करिअर शिबीर!

## भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

### विद्यार्थ्यांना मिळणार कौशल्य, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन

**। पिंपरी चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**भोसरी विधानसभा मतदार संघातील शालेय विद्यार्थ्यांना रोजगार, कौशल्य आणि उद्योजकता मार्गदर्शन मिळावे. तसेच, विविध शिष्यवृत्तींबाबत माहिती मिळावी, याकरिता भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने "छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराचे आयोजन केले आहे.**



राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या पुढाकाराने "छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबीर" राज्यातील प्रत्येक विधानसभा मतदार संघात आयोजित करण्यात येत आहे. त्यानुसार, भोसरी विधानसभा मतदार संघातील सर्वच शाळा-महाविद्यालयांना या उपक्रमामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

भोसरीतील कै. अंकुशराव लांडगे सभागृह येथे दि. १ जून २०२३ रोजी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत विविध विषयावर शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ व व्याख्याते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या मार्गदर्शन शिबिरात सहभागी होण्याकरिता इयत्ता ८ ते १२ वी पर्यंत आणि आयटीआय (इंडस्ट्रिअल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट) विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे, अशी माहिती समन्वयक निखील काळकुटे यांनी दिली.

शिबिरात शैक्षणिक विषयातील तज्ञ व व्याख्याते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. त्याचा फायदा विद्यार्थ्यांच्या भविष्यात मोलाचा ठरणार आहे. त्याकरिता अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या शिबिरात सहभागी व्हावे. शिबिरामध्ये शालेय प्रवेश व अभ्यासक्रम, कलामापन चाचणी, स्कॉलरशिप व कर्ज योजना, व्यवसाय व त्यासाठी कर्ज आणि करिअर अशा महत्त्वपूर्ण विषयांबाबत मार्गदर्शन करण्यात येईल, असेही निखील काळकुटे यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी कुंदन लांडगे – 9890800066 आणि निखील काळकुटे – 9168683949 यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# हॉटेलला ऑनलाईन रेटिंग देणे पडले महागात, तरुणाला ११ लाखांचा गंडा; चिंचवड पोलिसांत गुन्हा दाखल



**। पिंपरी चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

हॉटेलची प्रसिद्धी होण्यासाठी त्यांची ऑनलाइन लिंक पाठविली जाईल. तुम्ही फक्त तिला रेटिंग द्यायचे. त्या बदल्यात तुम्हाला कमिशन दिले जाईल, असे आमिष दाखविले. सुरुवातील पैसेही दिले. या टास्कमध्ये अधिक पैसे गुंतविले, तर त्याचा चांगला परतावाही मिळेल, असे सांगून पैसे भरण्यास भाग पाडून तरुणाची तब्बल १० लाख ९५ हजार ८२ रुपयांची फसवणूक केली. ही घटना १० मे ते १७ मे या कालावधीत चिंचवड येथे घडली.

या प्रकरणी गणेश मुकुंद अमृतकर (वय २८, रा. चिंचवड) यांनी चिंचवड पोलिस ठाण्यात गुरुवारी (दि.२५) फिर्याद दिली. त्यानुसार, पोलिसांनी टेलिग्राम चॅनल चालक याच्यासह दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांना अनोळखी क्रमांकावरून मेसेज आला. त्यामध्ये बिझनेससाठी हॉटेलला रेटिंग दिले, तर हॉटेलची सकारात्मक प्रतिमा तयार होईल, असे सांगून रेटिंग दिल्यानंतर पैसे मिळतील, असे आमिष दाखविले. फिर्यादी यांना आलेल्या लिंकवर क्लिक करून, हॉटेलला एका वेबसाइटच्या माध्यमातून रेटिंग द्यायचे होते. त्या बदल्यात फिर्यादी यांना सुरुवातीला चांगले पैसेही मिळाले. फिर्यादी यांनी या टास्कमध्ये पैसे गुंतविले, तर त्यांना चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखवून त्यांना एका टेलिग्राम चॅनलमध्ये घेण्यात आले. त्यातून फिर्यादी यांनी टास्क पूर्ण करताना अधिक पैशांच्या आमिषाने आरोपींनी दाखवून तब्बल १० लाख ९५ हजार ८२ रुपये भरण्यास भाग पाडले.

# ग्रामीण महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांचा तुलनात्मक अभ्यास




ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी पायाभूत सुविधा कळीच्या असतात. रस्ते, सिंचन, पिण्याचे पाणी, सांडपाणी निचरा, प्राथमिक शिक्षण, रोजगार शिक्षण, रेशनिंग, वित्तीय सुविधा, आरोग्यविषयक सुविधा जितक्या उत्तम तितके ग्रामीण जनतेचे आणि अर्थव्यवस्थेचे आरोग्य उत्तम. या सुविधा पुरवणे हे राज्य सरकारचे प्राथमिक काम. यातले बरेचसे विषय ग्राम पंचायतीच्या अखत्यारीत येत असले तरी राजकीय लोक नेतृत्व करत असतात. ते सत्ताधारीच असले पाहिजेत असे नाही. विरोधी पक्षात असलेल्या नेतृत्वाचीसुद्धा आपापल्या भागात स्थानिक स्वराज्य संस्थांवर चांगलीच पकड असते. सक्षम राजकीय व्यवस्था असेल तर लोकांपर्यंत त्याचे फायदे पोहोचतात. नाही तर आपल्याच मतदारसंघात, आपल्याच जवळच्या लोकांत हे फायदे जिरून जातात.

राजकारणी लोकांच्या बरोबरीने नोकरशाहीसुद्धा यासाठी जबाबदार असतेच. राजकारणी लोक आणि नोकरशाही टीम म्हणून कार्यरत असावेत आणि त्यांनी आपल्या आपल्या जबाबदाऱ्या सांभाळून विकास लोकांपर्यंत न्यावा ही अपेक्षा असते. म्हणून आजवरच्या राजकारण्यांच्या आणि नोकरशहांच्या कामगिरीचे मूल्यमापन करायचे असेल तर ग्रामीण पायाभूत सुविधांची परिस्थिती तपासून पाहणे आवश्यक. या निकषावर आजचा महाराष्ट्र कुठे आहे? विशेषत: तो इतर राज्यांच्या तुलनेत कुठे आहे, हे तपासून पाहण्यासाठी आम्ही गाव पातळीवरच्या आकडेवारीचा अभ्यास केला. हा अभ्यास करताना एखाद्या गावाला वंचित म्हणण्यासाठी पायाभूत सुविधांशी निगडित १९ स्वतंत्र निकष ठरवले.



यातील काही निकषांबाबत शासनाचे स्वतंत्र निकष असतात. उदा ठरावीक लोकसंख्येमागे इतक्या प्राथमिक शाळा वगैरे स्वरूपाचे हे निकष असतात. आदिवासी क्षेत्रात आणि उर्वरित महाराष्ट्रात हे निकष वेगळे असतात. त्यामुळे एखाद्या गावात शाळा आहे की नाही हे तपासताना वरील निकष लक्षात ठेवावे लागतील. पण आम्ही निकष निवडताना मुद्दामच इतके टोकाचे निवडले की त्या निकषावर एखादे गाव वंचित आहे की नाही याबाबत वाद उरू नये. उदाहरणार्थ, भाग आदिवासी क्षेत्रातील असो किंवा त्या बाहेरील, गावाच्या १० किमीच्या परिघात प्राथमिक शाळा नसणे याला नक्कीच वंचना म्हणता येईल.

तक्ता क्रमांक १ मधील निकषांवर महाराष्ट्र, भारत आणि काही राज्यांची तुलना करू या. तक्ता क्रमांक २ मध्ये या निकषांवर महाराष्ट्र, भारत, केरळ, गुजरात, बिहार, उत्तर प्रदेश आणि तमिळनाडू या राज्यांतील किती टक्के गावे वंचित आहेत हे पाहू या. या अभ्यासासाठी भारत सरकारच्या मिशन अंत्योदय पोर्टलवर उपलब्ध असलेली २०१८-१९ सालची सरकारी आकडेवारी वापरली आहे. तक्ता क्रमांक ३ मधील फक्त ५ निकष वगळता (निकष क्र. ४, ९, १५, १६, १८) तर उर्वरित निकषांवर महाराष्ट्राची कामगिरी उर्वरित भारतापेक्षा अधिक खराब किंवा तेवढीच आहे. महाराष्ट्र आर्थिकदृष्ट्या प्रगत आहे, म्हणजे महाराष्ट्रातील काही भाग आर्थिकदृष्ट्या प्रगत आहेत. उदा. मुंबई भारताची आर्थिक राजधानी आहे वगैरे. परंतु ग्रामीण महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांबाबत मात्र हे चित्र आशादायी नाही. भारताच्या तुलनेत महाराष्ट्र मागासलेला आहे. केरळ, गुजरात यांची कामगिरी महाराष्ट्रापेक्षा खूपच सरस आहे. बहुतेक सगळ्या बाबतीत तमिळनाडूसुद्धा महाराष्ट्राच्या पुढे आहे. कदाचित कोणी असेही म्हणेल की केरळ, गुजरात वगैरे राज्यांतून गावांची संख्याच कमी आहे. केरळमध्ये फक्त १,५९४ गावे तर गुजरातमध्ये १८,५५६ गावे आहेत. याउलट महाराष्ट्रात ४३,७२० गावे आहेत. शिवाय केरळ, गुजरात या राज्यांचे दरडोई उत्पन्नसुद्धा महाराष्ट्रापेक्षा जास्त आहे. म्हणून या राज्यांना अधिक सुविधा पुरवणे शक्य होते असे म्हणता येईल. पण मग उत्तर प्रदेशात तर १,०३,०६४ गावे आहेत आणि उत्तर प्रदेशचे दरडोई उत्पन्नही महाराष्ट्रापेक्षा खूपच कमी आहे. तरीसुद्धा चार निकष सोडले तर बाकी सगळ्या निकषांबाबत उत्तर प्रदेशची स्थिती महाराष्ट्रापेक्षा उजवी आहे किंवा तेवढीच आहे. बिहार हे ४५,८२० (म्हणजे साधारण महाराष्ट्राइतकेच) गावे असलेले राज्य आहे. पण बहुसंख्य निकषांवर बिहारची कामगिरीसुद्धा महाराष्ट्रापेक्षा उजवी आहे. उत्तर प्रदेश, बिहार यांना बिमारू, मागासलेली म्हणून हिणवायची प्रथा महाराष्ट्रात आहे, पण ग्रामीण सुविधांबाबत तरी परिस्थिती उलटी दिसते.

## संपादकीय »

### शतायुषी अमेरिकी चाणक्य

***हेन्री किसिंजर आज वयाची शंभर वर्षे पुरी करीत आहेत. अमेरिकेचे माजी परराष्ट्रमंत्री किसिंजर यांचा जन्म २७ मे १९२३चा.***

शीतयुद्धाचा आरंभ व शेवट पाहणारा आणि या काळातल्या पुष्कळशा जागतिक घडामोडी घडविणारा असा दुसरा राजनीतिज्ञ नाही. आजही किसिंजर यांचा मेंदू तरतरीत आहे आणि कंबोडियावरील अमेरिकी हल्ल्यांबाबत प्रश्न विचारल्यावर राग येण्याइतका तोराही टिकून आहे. जर्मनीत ज्यू धर्मात जन्मलेले किसिंजर बालवयात अमेरिकेत आले. पुढे ते पीएच.डी. झाले आणि हार्वर्ड विद्यापीठात शिकवू लागले. अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणातील त्यांचा सहभाग व प्रभाव क्रमाक्रमाने वाढत गेला. याची सुरुवात साठच्या दशकातच झाली आणि आजही तो संपलेला नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची दोन छावण्यांमध्ये विभागणी झाली. साम्यवाद हाच आपला पहिल्या क्रमांकाचा शत्रू आहे, याचा विसर अमेरिकेने कधीही पडू दिला नाही. कम्युनिझमला विरोध करताना, साधनविवेकाला निर्णायक सोडचिठ्ठी देऊन त्याचे तत्त्वज्ञान करण्याचे महत्त्वाचे काम किसिंजर यांनी केले.

**मुंबईमध्ये राबणाऱ्या अनेकांचे हातावर पोट असते. पण मुंबईत राबणाऱ्या अनेकांचे फिरत्या पायांवरही पोट अवलंबून असते. दिवसभर धावपळीची नोकरी, सतत वणवण फिरणे आणि असे भटकतानाच कुठेतरी प्रवासातच डबा खाणे अशी या पोटाची व्याख्या करता येईल. सकाळी घरातून निघताना भरलेला डबा, दुपारी भूक लागल्यावर कुठल्या तरी स्थानकात, बागेत, उद्यानात, मैदानाजवळ बसून खाल्ला जातो.**

## फिरत्या पायांवरचे पोट

आजूबाजूची धूळ, माश्या, भिकारी, पडलेला कचरा हे सारे नजरेआड करत हा डबा खावा लागतो. कारण हाच डबा उरलेल्या दिवसात धावपळ करायला, फिरायला, काम करायला ताकद देतो. कधी काहींच्या खिशात दररोज हॉटेलमध्ये जाऊन खाण्याइतके पैसेही नसतात. तर कधी कुणाला आरोग्यासाठी हॉटेलचे अन्न नको असते. अशावेळी घरून आणलेला डबाच महत्त्वाचा असतो. पण हा डबा आणला तरी निवांत बसून खायची सोय, त्या अन्नाचा आस्वाद घेता येईल अशी सोय मुंबईत आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो.शेजारून वेगाने चाललेली लोकल, कधी त्या वेगामुळे उडणारी धूळ, कधी अचानक आलेल्या वाऱ्यामुळे उडणारी धूळ यांच्यापासून डबा वाचवत दुपारच्या वेळी जेवणारे मुंबईकर अनेकदा दिसतात. या शहराला असे डबे खाणाऱ्यांची सवय आहे. लोकलकडे पाठ करून, त्यातल्या त्यात एकांत शोधून, मिळालेल्या चौथऱ्यावर बसून डबे खाणारी माणसे.. सार्वजनिक उद्यानात वर्तमानपत्रे पसरून त्यावर डबे मांडून दुपारी जेवणारी माणसे, शिवाजी पार्कसारख्या कट्ट्यावर बसून डबे खाणारी माणसे या सगळ्यांना दुपारचे जेवणही निवांत व्हावे या दृष्टीने हे शहर नेमक्या काय सुविधा देते? जेवणाच्या आधी स्वच्छ हात धुणे, जेवणानंतर स्वच्छ हात धुणे हे अनेकदा पुस्तकातच राहते. उपलब्ध असलेल्या पाण्याच्या बाटलीतील पाण्याने हात





कसेबसे स्वच्छ केले जातात. बॅगेतील एखाद्या रुमालाला हात पुसून उरलेले पाणी संपवून ही माणसे पुढचा रस्ता चालू लागतात. यातील काही माणसे मुंबईला सेवा पुरवणाऱ्यांपैकीही असतात. पण या शहराला सेवा देणाऱ्यांच्या जेवणासाठी निवांत जागा मिळावी अशा गरजाही इथे पूर्ण झालेल्या दिसत नाहीत. कधी असे उघड्यावर डबे खाताना आजूबाजूच्या अस्वच्छतेकडे दुर्लक्ष करावे लागते.

सुरुवातीला इथे डबा कसा खायचा, हा निर्माण झालेला प्रश्न नंतर मनात डोकावतही नाही. आता, इथे डबा खाल्ला नाही तर उपाशी राहावे लागेल ही जाणीव असे प्रश्न मनात येऊ देत नाही. कधी असा डबा खाताना आजूबाजूला रेंगाळणारे भिकारी, त्यांची अन्न मिळावे, पाणी मिळावी अशी असलेली अपेक्षा, याकडेही मग दुर्लक्ष करता येते.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।  
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥  
नव्हे आराणुक लौकिकापासून ।  
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# विरोधकांचे बहिष्कारास्त्र!

## नव्या संसद भवनाचे आज पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज अशा संसदेच्या नव्या इमारतीचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज, रविवारी करण्यात येणार पीटीआय, नवी दिल्ली : अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज अशा संसदेच्या नव्या इमारतीचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज, रविवारी करण्यात येणार आहे. मात्र, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नव्या संसद भवनाचे उद्घाटन करण्याचा आग्रह धरीत काँग्रेससह २० पक्षांनी या कार्यक्रमावर बहिष्कार घातला असून, शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत झालेल्या निती आयोगाच्या बैठकीवरही त्याचे सावट दिसले. या बैठकीकडे १० मुख्यमंत्र्यांनी पाठ फिरवली.**



नवे संसद भवन उद्घाटनासाठी सज्ज झाले आहे. मात्र, उद्घाटन समारंभावर बहिष्कार घालण्याची विरोधी पक्षांची भूमिका कायम राहिली. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील तणावाचे प्रतिबिंब शनिवारी झालेल्या निती आयोगाच्या बैठकीतही दिसले. या बैठकीत दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, पंजाबचे भगवंत मान, बिहारचे नितीशकुमार, पश्चिम बंगालच्या ममता बॅनर्जी, राजस्थानचे अशोक गेहलोत, तेणंगणचे के. चंद्रशेखर राव, तमिळनाडूचे एम. के. स्टॅलिन, केरळचे पिनराई विजयन आणि कर्नाटकचे सिद्धरामय्या यांनी पाठ फिरवली. ओदिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनाईक हेही बैठकीत अनुपस्थित होते. दहा मुख्यमंत्र्यांच्या अनुपस्थितीबाबत भाजपने विरोधकांना लक्ष्य केले.

दुसरीकडे, भाजपने नव्या संसद भवनाच्या उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर वातावरण निर्मितीवर भर दिला. नव्या संसद भवनाचा प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटेल, अशी प्रतिक्रिया व्यक्त करून पंतप्रधान मोदी यांनी शुक्रवारी त्याची चित्रफित समाजमाध्यमावर प्रसारित केली होती. उत्तर प्रदेशातील मिर्झापूर येथील कार्पेट्स, त्रिपुरातील बांबूची फरशी आणि राजस्थानातील दगडी कोरीव काम हे भारताच्या विविध संस्कृतींचे प्रतिबिंब या इमारतीच्या बांधकामात आहे. ब्रिटिशांकडून सत्तेच्या हस्तांतरणाचे प्रतीक म्हणून पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी स्वीकारलेला 'सेंगोल' (राजदंड) हा तमिळनाडूतील ऐतिहासिक राजदंड संसदेच्या इमारतीतील सभागृहात लोकसभा अध्यक्षांच्या आसनाजवळ बसवण्यात येणार आहे. मात्र, उद्घाटन समारंभावर २० विरोधी पक्षांनी बहिष्कार घातला असून, आता सेंगोलवरूनही राजकारण सुरू झाले. सेंगोल हे ब्रिटिशांकडून भारताकडे सत्ता हस्तांतरित करण्याचे प्रतीक असल्याचे वर्णन लॉर्ड माउंटबॅटन, सी. राजगोपालाचारी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केल्याचे कोणतेही कागदोपत्री पुरावे उपलब्ध नाहीत, असा दावा काँग्रेसनेते जयराम रमेश यांनी शुक्रवारी केला होता. काँग्रेसच्या सेंगोलबद्दलच्या भूमिकेवर गृहमंत्री अमित शहा यांची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले की, काँग्रेसने आपल्या वर्तनाबाबत 'चिंतन' करण्याची गरज आहे. सेंगोल हे सत्ता हस्तांतरणाचे प्रतीक असल्याचा कोणताही पुरावा नसल्याच्या काँग्रेसच्या दाव्याचेही त्यांनी खंडन केले.

### 75 रुपयांच्या नाण्याचे अनावरण

**या कार्यक्रमाप्रीत्यर्थ ७५ रुपयांच्या नाण्याचे अनावरण करण्यात येईल. राजपत्रातील अधिसूचनेनुसार, या नाण्याचे वजन ३४.६५ ते ३५.३५ ग्रॅम असू शकते. नाण्याच्या एका बाजूला मध्यभागी देवनागरी लिपीतील 'भारत' आणि इंग्रजीमध्ये 'इंडिया' असा शब्द आणि अशोकस्तंभाची तीन सिंहांची राजमुद्राही असेल. त्याखाली नाण्याचे रुपये ७५ हे मूल्य कोरलेले असेल. नाण्याच्या दुसऱ्या बाजूला संसदेच्या संकुलाची प्रतिमा असेल आणि त्या खाली इंग्रजीमध्ये '२०२३' हे सन कोरलेले असेल.**

---

# पुणे लोकसभेच्या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसचा दावा

## अजित पवारांच्या वक्तव्याने काँग्रेसमध्ये अस्वस्थता

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खासदार गिरीश बापट यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पुणे लोकसभा मतदार संघाची निवडणूक लढविण्यास आम्ही इच्छुक असल्याचे सांगत राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी पुण्याच्या जागेवर शनिवारी दावा केला. पुण्यात राष्ट्रवादीची जास्त ताकद असल्याने ही जागा आम्हाला मिळावी, असेही पवारांनी या वेळी सांगितले. पवार यांच्या या वक्तव्याने शहर काँग्रेसमध्ये अस्वस्थता पसरली आहे.**



पुणे दौऱ्यावर आल्यानंतर विरोधी पक्षनेते पवार पत्रकारांशी बोलताना म्हणाले, 'लोकसभा निवडणुकीला एक वर्ष राहिले आहे. त्यामुळे पुण्यासाठी पोटनिवडणूक लागणार नाही, असे वाटले होते. मात्र, पोटनिवडणूक लागणार असल्याची माहिती मिळाली आहे. पुण्यात आमची ताकद जास्त असल्याने आम्ही पुण्याची जागा लढविण्यासाठी इच्छुक आहोत. सध्याची परिस्थिती पाहता राष्ट्रवादीची ताकद इतर घटक पक्षांच्या तुलनेत जास्त आहे. महानगरपालिकेत आम्ही आमची ताकद दाखवली आहे. आमचे ४० नगरसेवक होते. आमच्या मित्र पक्षाचे दहा नगरसेवक होते. शहरात राष्ट्रवादीचे दोन आमदार आहेत. ज्या ठिकाणची निवडणूक लागेल त्या ठिकाणी आमच्या घटक पक्षांपैकी कोणाची ताकद जास्त असेल, त्यांना ती जागा मिळावी, असे माझे स्वत:चे मत आहे.

### काँग्रेसलाच जागा मिळणार: मोहन जोशी

**मोहन जोशी पुढे म्हणाले की, मागील काही वर्षांपासून पुणे शहर लोकसभा मतदारसंघ हा काँग्रेसचाच आहे. त्यामुळे हा मतदार संघा काँग्रेसकडेच राहिल. या निवडणुकीसंदर्भात निर्णय घेत असताना महाविकास आघाडीचे सर्व नेते मुंबईत एकत्र बैठक घेऊन उमेदवारीबाबत निर्णय घेतली. महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नाही आहेत आणि राजकारणही नाही आहेत. त्यामुळे फक्त भाजपचा पराभव करायचा हेच महाविकास अघाडीचं लक्ष्य असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं आहे.**

### एकत्र निर्णय घेऊ: संजय राऊत

**शिवसेना नेत्यांनी अजित पवार यांच्या दाव्यावर काही प्रमाणात पाठिंबा दिल्याचं दिसत आहे. ते म्हणाले की, अजित पवार यांच्या म्हणण्यानुसार पुण्यात राष्ट्रवादीची ताकद असल्याचं दिसत आहे. मात्र महाविकास आघआडीतील प्रत्येक निर्णय तीन पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी एकत्र येऊन घेतला जातो.**

# मला संतोष जुवेकरच हवा आहे...



झेंडा, मोरया, एक तारा आणि यासारखे कितीतरी चित्रपट गाजवलेला उत्तम अभिनेता म्हणजे संतोष जुवेकर. तो सोशल मिडियावरही बराच सक्रिय असतो. त्याचा चाहता वर्ग मोठा आहे. संतोष अभिनया सोबत सामाजिक कामातही बराच सक्रिय असतो. काही दिवसांपूर्वीच त्याचा '36 गुण' हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटात तो अत्यंत वेगळ्या भूमिकेत दिसला. आता मात्र त्याने मोठी घोडदौड घेतली आहे. लवकरच तो बॉलीवुड मध्ये झळकणार आहे. याच चित्रपटाबद्दल त्याने एक किस्सा आज शेयर केला आहे. संतोष लवकरच 'कुत्ते' या हिंदी चित्रपटात झळकणार आहे. याच चित्रपटाचा टीजर शेयर करत त्याने एक पोस्ट लिहिली आहे. तो म्हणतो 'मित्रांनो १३ जानेवारीला एक अजून धमाका.. "कुत्ते".. खूप स्वप्नं आहेत, त्यातील एक अजून स्वप्न सत्यात उतरलं, विशाल भारद्वाज ह्यांच्या प्रोडक्शन मधे आणि त्यांच्या सिनेमात काम करण्याचं भाग्य मला मिळालं.. आणि तेही ऑडिशन न देता डायरेक्ट कास्ट केलं मला त्यांनी." पुढे तो म्हणाला, "जेंव्हा मुकेश छाबरा (कास्टिंग डिरेक्टर) सरांच्या ऑफिसमधून कॉल आला २०२१ ला.. तेंव्हा मी विचारलं की, सर ऑडिशन करने स्टुडिओ कब आना हैं?" त्यावर ते म्हणाले.. "अरे नही विशाल सरने खुद तुम्हारा नाम मेंशन किया है के.. मुझे ये कॅरेक्टर के लीये संतोष जुवेकर ही चाहिये.." आयच्या गावात अजून काय पाहिजे राव.. माझ्या ह्या स्वप्नांं साठी तुमच्या शुभेच्छा तुमची साथ आणि बाप्पाचा आशिर्वाद कायम हवाय...... हक्काने.." अशी पोस्ट त्याने केली आहे.

# प्रसिद्ध ब्रान्ड विरोधात अनुष्का शर्मा

बॉलीवूड अभिनेत्री अनुष्का शर्मा भडकलीय ही बातमी काही क्षणात वाऱ्यासारखी पसलरी अन् जो-तो चर्चा करू लागला. नेहमीच मस्तीच्या मूडमध्ये दिसणारी अनुष्का खूप बिनधास्त आणि रोखठोक आहे. पण तिला असं भडकताना खूप कमी पहायला मिळालं आहे. आता एका ब्रान्डनं अशी काही हरकत केलीय ज्यानं अभिनेत्रीचा पारा चढला. आणि अनुष्कानं यासाठी ब्रान्डला तिखट भाषेत सुनावलं आहे.

झालं असं की प्रसिद्ध ब्रान्ड पूमाने अनुष्का शर्माचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोमध्ये अभिनेत्रीनं पूमाचे टॉप, को-ऑर्ड सेट आणि जॅकेट घातलं आहे. या फोटोंना शेअर करत या ब्रान्डने सेलिब्रिटी देखील कसे आपला ब्रान्ड वापरतात यासंदर्भात नेटकऱ्यांशी भाष्य केले. पण आपल्या फोटोंना कंपनीनं प्रमोशन साठी वापरणं अनुष्का शर्माला मुळीच आवडलं नाही. कारण यासाठी तिची परवानगी घेण्यात आली नव्हती.

अनुष्काच ती..डोकं फिरल्यावर लागलीच तिनं आपल्या इन्स्टा स्टोरीत पूमा कंपनीची ती प्रमोशनवाली पोस्ट शेअर करत लिहिलं की," हॅलो पूमा इंडिया. मला वाटतं की तुम्हाला कदाचित ही गोष्ट चांगलीच माहित असेल की माझ्या परवानगी शिवाय तुम्ही माझे फोटो तुमच्या प्रमोशनसाठी वापरू नाही शकत. कारण मी तुमची ब्रान्ड



# फिफा'च काय कान्स मध्येही दीपिकाने धुरळा उडवला



सगळ्यांचे लक्ष अनेक दिवसांपासून वेधून असलेला फिफा विश्वचषक 2022 फूटबॉल अंतिम सामाना काल कतारच्या लुआस स्टेडियमवर अर्जेंटिना आणि फ्रान्स यांच्यात रंगला. या सामन्यात अर्जेंटिनाने बाजी मारली. यावेळी अभिनेत्रीने दीपिका पदुकोणने फिफा विश्वचषक 2022 ची ट्रॉफी लाँच करून भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. यावेळी दीपिकाचा लुक, तिची फॅशन तिचे कर्तृत्व या साऱ्याचीच बक्कळ चर्चा झाली. पण दीपिकाला मिळालेला हा काही पहिलाच बहुमान नव्हता. याआधीही जगातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या कान्स फिल्म फेस्टिवलमध्ये दीपिकाने आपली जादू दाखवली होती. त्याचीच ही गोष्ट.. यंदाच्या 'कान्स' मध्ये भारतातून मनोरंजन विश्वातील अनेक कलाकारांचा मोठा ताफा गेला होता. केंद्रीय मंत्री अनुराग ठाकुर यांच्यासह तापसी पन्नू, नवाझुद्दीन सिद्धिकी, दीपिका पदुकोण, नयनतारा, आर माधवन यांच्या नावाचा समावेश आहे. पण त्यात विशेष ठरली. कारण दीपिका यंदाच्या कान्समध्ये परिक्षकाच्या भूमिकेत होती. कान्समध्ये तिच्या लुकची, कपड्यांची साऱ्याचीच चर्चा झाली. पण दीपिका हिट ठरली ते तिच्या भाषणामुळे.. तिच्या भाषणामुळे सारेच अवाक झाले. यावेळी दीपिका म्हणाली होती, 'कान्ससारख्या जागतिक चित्रपट महोत्सवामध्ये भारताला मिळालेला गौरवाचं स्थान समस्त भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे. कान्सला देखील 75 वर्षे पूर्ण झाली आहेत.

# अमृता पत्कीच्या नृत्याचा जलवा!



अभिनेत्री अमृता पत्की हिने ग्लॅमर विश्वात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. २००६च्या 'मिस इंडिया' या सौंदर्य स्पर्धेपर्यंत यशस्वी ठरल्यानंतर अमृताने आंतरराष्ट्रीय पातळीवरही 'मिस अर्थ' स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले आणि तिथेही 'मिस अर्थ एअर'चा किताब मिळवला होता. अमृताने २०१०मध्ये बॉलिवूडमध्ये पदार्पण केले, त्यानंतर काही मराठी चित्रपटांमध्ये ती झळकली होती. मराठी-हिंदी चित्रपटांमध्ये झळकलेली ही गुणी अभिनेत्री आता बऱ्याच कालावधीनंतर 'सुर्या' या चित्रपटातून मराठी रुपेरी पडद्यावर दिसणार आहे. सध्या मराठी चित्रपटात बॉलीवूड तारका आयटम साँगवर थिरकताना दिसतायेत. या यादीत अमृताचाही समावेश झाला आहे. अमृता पत्की हिच्या नृत्याचा जलवा 'सुर्या' या आगामी मराठी चित्रपटात पहायला मिळणार आहे.

'रापचिक रापचिक कोळीणबाई' असे बोल असणाऱ्या या गाण्यात अमृताचा नखरेल अंदाज पहायला मिळणार आहे. नृत्यदिग्दर्शक उमेश जाधव यांनी या गाण्याचे नृत्यदिग्दर्शन केले आहे. संतोष दरेकर, मंगेश ठाणगे, देव चौहान यांनी लिहिलेल्या गाण्याला देव चौहान यांचे संगीत लाभले आहे. ममता शर्मा आणि देव चौहान यांनी आपल्या दमदार आवाजात हे गाणं गायलं आहे. राजेंद्र ठाकरे आणि आकाश गोयल प्रस्तुत एस. पी. मोशन पिक्चर्सच्या 'सुर्या' हा अ‍ॅक्शनपॅक्ड चित्रपट ६ जानेवारीला संपूर्ण महाराष्ट्रभर प्रदर्शित होणार आहे.

# हिरो ठरले झिरो!

## 5 जणांमुळे मुंबई इंडियन्सचा झाला पराभव, तिसऱ्या खेळाडूने तर मातीच खाल्ली

।अहमदाबाद।
महाईन्यूज। वृत्तसंस्था।

**रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्स आयपीएल २०२३ मधून बाहेर झाली आहे. मुंबई इंडियन्सचा आलेख यंदाच्या आयपीएलमध्ये चढता उतरता दिसला. पंस संघाने अनपेक्षित आणि शानदार कामगिरी करत नव्या खेळाडूंसह दमदार कामगिरी केली. मुंबई संघाने गुजरात टायटन्सविरुद्ध लीगमधील दुसरा क्वालिफायर सामना हरला. नरेंद्र मोदी स्टेडियमवर गिलच्या १२९ धावांनी गुजरातला २३३ पर्यंत नेले. तर मुंबईचा डाव केवळ १७१ धावांवर आटोपला. मुंबई इंडियन्सच्या पराभवाला कारणीभूत ठरणाऱ्या ५ खेळाडूंबद्दल सांगणार आहोत.**



### रोहित शर्मा

रोहित शर्मा हा मुंबई इंडियन्सच्या संघाचा कर्णधार आहे. मुंबई इंडियन्सच्या पराभवाच्या प्रमुख कारणांमध्ये कर्णधार रोहित शर्माचाही समावेश आहे. जगातील अव्वल फलंदाजांपैकी एक असलेला रोहित सलग दुसऱ्या प्लेऑफ सामन्यात अपयशी ठरला. मोठ्या धावसंख्येसमोर संघाला त्याच्याकडून चांगल्या सुरुवातीची अपेक्षा होती. पण रोहित शर्मा स्वस्तात बाद होत पॅव्हेलियनमध्ये परतला.

### पीयूष चावला

पीयूष चावला हा आयपीएल २०२३ मध्ये मुंबईसाठी सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज होता. पण या सामन्यात त्याने १५च्या इकॉनॉमीसह धावा खर्च केल्या. त्याच्या ३ षटकात त्याने ४५ धावा दिल्या.

### ख्रिस जॉर्डन

४ षटकांत ५६ धावा देणाऱ्या ख्रिस जॉर्डनने तर या सामन्यात संघाला दुहेरी धक्का दिला. त्याने ४ षटकांत जबरदस्त धावा दिल्याचं. पण त्याने संघाचा दमदार सलमीवीर आणि यष्टीरक्षक इशान किशनला दुखापत केली. संपूर्ण मोसमात तो डेथ ओव्हर्समध्ये अपयशी ठरला. इशानच्या दुखापतीमुळे मुंबईला आपली संपूर्ण फलंदाजी बदलावी लागली. तसेच ईशान किशनच्या बॅटमधून येत असलेल्या धावा त्या सामन्यातही चांगल्याच उपयोगी ठरल्या असत्या.

### विष्णू विनोद

ईशान किशनच्या जागी संघात समावेश करण्यात आलेल्या विष्णू विनोदला टेम्पो राखता आला नाही. ग्रीन बाद झाल्यानंतर खेळायला आलेल्या विष्णूला उघडपणे शॉट खेळता आले नाही आणि त्यामुळे सूर्यकुमार यादववर अधिक दडपण वाढले आणि सूर्यानंतर विनोद सुद्धा स्वस्तात बाद होत पॅव्हेलियनमध्ये परतला.

### टीम डेव्हिड


पॉवरप्लेमध्येच टीम डेव्हिडने शुभमन गिलचा झेल सोडला. यानंतर गिळणे सगळ्यांची झोप उडवली आणि १२९ धावांपर्यंत मजल मारली. फलंदाजीतही त्याच्याकडे रशीद खानच्या चेंडूसाठी उत्तर नव्हते आणि तो स्वस्तात बाद झाला. सूर्यानंतर त्याच्यावर संघाची जबादारी होती पण डेव्हिड ३ चेंडूत त्याच्या बॅटमधून फक्त २ धावा आल्या.

---

# शहरी भागात देशी खेळांचे अस्तित्व टिकवणे गरजेचे

## राज्य ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांनी व्यक्त केली खंत

।पुणे।
महाईन्यूज। वृत्तसंस्था।





**कबड्डीच नाही तर खो-खोसारखे देशी खेळ शहरी भागातून कमी होत चालल्याची खंत व्यक्त करून महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांनी शहरी भागातील देशी खेळांचे अस्तित्व टिकायला हवे आणि त्यासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज असल्याची भावना व्यक्त केली. पुणे जिल्हा कबड्डी संघटनेच्या नूतनीकरण केलेल्या कार्यालयाचे उद्घाटन आणि राज्य, राष्ट्रीय पातळीवर चमक दाखविणाऱ्या कबड्डीपटूंचा अजित पवार यांच्या हस्ते शनिवारी गौरव करण्यात आला. यावेळी अजित पवार बोलत होते.**

"पुणे जिल्हा संघटनेच्या समोरील मैदानावर हा गौरव सोहळा पार पडला. एक काळ असा होता की मुंबई, पुण्यातील संघ कबड्डीवर हुकमत गाजवत होते. मात्र, आता सातारा, सांगली, परभणी अशा ग्रामीण भागातील संघ वर्चस्व राखू लागले आहेत. शहरातून देशी खेळ कमी होत चालल्याची भीती वाटू लागली आहे. त्यामुळे शहरी भागातील देशी खेळांचे अस्तित्व टिकविण्यासाठी शासन आणि क्रीडा संघटनांनी एकत्रित काम करण्याची गरज आहे," पवार यांनी सांगितले. राज्यातील खेळाडूंवर अन्याय होणार नाही याकडे लक्ष देणे, खेळाडूंना शासकीय सेवेत सामावून घेणे, विविध भागांत सरावासाठी आमदार निधीतून मदत करणे अशा कामांना यापुढे प्राधान्य राहील, असेही पवार यांनी या वेळी सांगितले. या वेळी राष्ट्रीय स्पर्धेतील उपविजेत्या महाराष्ट्राच्या पुरुष संघाचा, तसेच राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्राच्या पुरुष, महिला आणि राज्य अजिंक्यपद स्पर्धेत निर्विवाद वर्चस्व राखणाऱ्या पुणे जिल्हा महिला संघातील खेळाडूंचा गौरव करण्यात आला. या वेळी राज्य कबड्डी संघटनेचे उपाध्यक्ष सुनील तटकरे, राज्य व पुणे जिल्हा संघटनेचे अन्य पदाधिकारी, अर्जुन पुरस्कार विजेते शांताराम जाधव, शकुंतला खटावकर यांच्यासह सूर्यकांत पाटील, माणिक भोगाडे, शोभा भगत, प्रविण नेवाळे असे अनेक आजी माजी कबड्डीपट्टू उपस्थित होते.

### राज्य अजिंक्यपद स्पर्धा पुण्यात

**यंदाच्या राज्य कबड्डी स्पर्धेच्या हंगामात राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन पुण्यात करण्यात येणार असून, कुमार गटाची स्पर्धा जळगाव येथे होणार आहे. या संदर्भातील अधिकृत घोषणा लवकरच करण्यात येणार आहे.**

---

# सुनील गावसकरांनी हार्दिक पांड्याची केली एम एस धोनीशी तुलना



।चेन्नई।
महाईन्यूज। प्रतिनिधी।

टीम इंडियाचे माजी कर्णधार सुनील गावसकर यांनी गुजरात टायटन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याचं कौतुक करत म्हटलं की, तो संघात ज्या प्रकारची वातावरण निर्मिती करतो, ते पाहून महेंद्र सिंग धोनीची आठवण येते. पांड्याच्या नेतृत्वात गुजरात टायटन्स सलग दुसऱ्यांदा आयपीएल फायनलमध्ये पोहोचली आहे. शुक्रवारी गुजरातने पाचवेळा चॅम्पियन असणाऱ्या मुंबई इंडियन्सचा ६२ धावांनी पराभव केला. हार्दिक धोनीचा खूप मोठा चाहता असल्याचं नेहमीच सांगतो, असं गावसकरांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

गावसकर पुढं म्हणाले, चेन्नई सुपर किंग्ज आणि गुजरात टायटन्स जेव्हा नाणेफेक करण्यासाठी मैदानात उतरतील, त्यावेळी दोघांच्याही चेहऱ्यावर हास्य असेल आणि हे खूप मैत्रीपूर्ण वातावरणात होईल. पण सामन्यात वेगळी परिस्थिती असेल. कमी वेळात खूप काही शिकलो, हे सिद्ध करण्याची संधी हार्दिक पांड्याकडे आहे. गतवर्षी जेव्हा हार्दिक पांड्याने पहिल्यांदा कॅप्टन्सी केली, तेव्हा कुणी विचारही केला नसले की, त्याच्याकडून काय अपेक्षा करायला पाहिजेत. कारण तो पहिल्यापासून खूप रोमांचक क्रिकेटर आहे. पण मागील एक वर्षापासून आम्ही पाहिलं की, संघात तो ज्या प्रकारे वातावरणनिर्मिती करत आहे, ते पाहून धोनीची आठवण येते. सीएसकेप्रमाणेच हा आनंदात राहणारा संघ आहे. याचं सर्व श्रेय हार्दिकला जात आहे.